**<u>सं.फौज.प्र. क्रमांकः– ३७३/२०२१</u>**
**महाराष्ट्र शासन ..वि.. हेमराज**
**<u>निशाणी क्रमांकः– ९ खाली</u>**

साक्षीदार क्रमांक **<u>४</u>** अभियोग पक्षाकरीता
शपथेवर बयाण देतो की,

माझे नाव **– देवचंद चांगो तलमले,**
वय – ३३ वर्षे,
व्यवसाय – शेती,
राहणार – कन्हाळगाव, ता. लाखांदूर, जि. भंडारा.

**<u>सरतपास – श्रीमती एस. व्ही. भेंडारकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत शपथेवर सुरू–</u>**

आरोपी हेमराज गौरी यांना मी ओळखत नाही. फिर्यादी चांगदेव ढोरे व जखमी शैलेश तलमले यांना मी ओळखतो. प्रस्तूतची घटना दि.२९/०७/२०२१ रोजी गॅस एजन्सीजवळ ५.५० मिनीटांनी सायंकाळी घडली होती. त्या वेळेस मी कृषी केंद्रावर खात घेण्यासाठी चाललो होतो. तेथे बस व लोक होते त्यामुळे आम्ही बघण्यास गेलो. तेव्हा पडलेला शैलेश दिसला. मग त्यास दवाखान्यात नेले. त्याच्या हाताला लागले होते. प्रस्तूतची घटना कशी झाली, कशामुळे झाली याबाबत मला माहित नाही. प्रस्तूतची घटना बसमुळे झाली होती व तेथे बसही थांबली होती. शैलेश यास ग्रामीण रुग्णालय लाखांदूर येथे नेले. त्यानंतर त्याचा भाऊ जगदिश नारायण तलमले तेथे आला. त्याने त्यास भंडाऱ्याला नेले. घटनास्थळावर मी पाहिले की, शैलेश पडला होता, टी.व्ही.एस. गाडी होती. पोलीसांनी मला दि.३१ रोजी लाखांदूर पोलीस स्टेशन येथे विचारपूस केली होती.

पूजा ना. कोकाटे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

**<u>उलटतपास आरोपीचे वकिल श्री. आर. जे. पिलारे यांचे मार्फत –</u>**

हे म्हणने खरे आहे की प्रस्तूतची घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. हे म्हणने खरे आहे की, या घटनेबाबत मला लोकांनी सांगितले म्हणून माहित आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

**फेरतपास काही नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृती,

POOJA NARAYAN KOKATE

Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2023.04.25 15:02:28 +0530

दिनांकः–२४/०४/२०२३

**(पूजा ना. कोकाटे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लाखांदूर